# महाराष्ट्र शासन

## साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.

पत्ता - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५
दुरध्वनी क्र. ०२०-२५५३८०४१ ते ४४, फॅक्स क्र. ०२०-२५५३८४९७
Email-commsugar.audit@gmail.com website – www.mahasugar.com.gov.in

जा.क्र.सा.आ./लेखापारीक्षण/कक्ष-५/आ.लेप.अह.मसूदा/ ५६८४ /२०१९ दिनांक २६/०६/२०१९

प्रति,

Institute of C. A. of India
DAIRY
Received On
14 FEB 2023
2031
PUNE INWARD NO

१. अध्यक्ष / सचिव,
इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊटंट्स ऑफ इंडिया (I.C.A.I.)
२. अध्यक्ष / उपाध्यक्ष / सचिव,
इन्स्टिटयुट व कॉस्ट अकाऊटंटस ऑफ इंडिया, अंतर्गत वेस्टर्न इंडिया रिजनल काऊन्सिल.
३. प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व.
४. विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, (साखर) सर्व.
५. कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाने, सर्व.

**विषय - सहकारी साखर कारखान्यांसाठी वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा लागू करणेबाबत.**

२/- महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या सुधारित अधिनियमान्वये संस्था प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करेल अशी तरतुद आहे. सहकारी संस्थांना / कारखान्यांना त्यांचे लेखापरीक्षण करून घेणे कायदयाने अनिवार्य आहे.

३/- सहकारी संस्थांचे / साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण आर्थिक वर्ष समाप्ती पासुन ४ महिन्यांचे आत, म्हणजेच दिनांक ३१ जुलै पर्यंत पूर्ण होणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे लेखापरीक्षकाने आपला लेखापरीक्षा अहवाल, लेखापरीक्षण पूर्ण झाले पासुन १ महिन्याचे कालावधीचे आत (दि. ३१ ऑगस्ट पर्यंत) आणि कोणत्याही परिस्थितीत वार्षिक साधारण सभेच्या बैठकीची नोटीस देणेपूर्वी संस्थेला आणि निबंधकाला सादर करणे बंधनकारक आहे.

४/- सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक व सांपत्तीक स्थिती, व्यावसायीक व्यवस्थापंन, ऊस ऊत्पादकांप्रती बांधिलकी, निधी व्यवस्थापन, कारखान्याची आर्थिक स्थिती निर्देशांक व गुणात्मक दर्जा इ. बाबी वस्तूस्थितीस अनुसरुन वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये लेखापरीक्षण अहवालाव्दारे भागधारक सभासदांपुढे मांडल्या जाणे सहकारी अधिनियमान्वये अभिप्रेत आहे.

५/- कारखान्याकडील विविध महत्वपुर्ण आर्थिक विषय व निकषनिहाय एकसमानतेने संबंधीत लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षणवेळी व लेखपरीक्षण अहवालाद्वारे प्रकाशझोत टाकणे आवश्यक आहे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल एकसमान व एकसुत्र राखणे आवश्यक झालेले आहे. तदनुषंगाने सर्व समावेशक लेखापरीक्षण अहवाल मसुदा लागू करणेची बाब या कार्यालयाचे विचाराधिन होती.

३/- नामतालिकेवरील लेखापरीक्षकांनी सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेली निरीक्षणे, आक्षेप, अभिप्राय समग्र, वस्तुनिष्ठ व कारखान्याकडील कार्यरत विभागनिहाय सर्व मुद्यांवर नोंदविले जाणेसाठी आदर्श लेखापरीक्षण अहवाल मसुदा ( लेखापरीक्षण अहवाल टेम्पलेट ) यासोबत जोडण्यात आलेला आहे. सदरहू आदर्श लेखापरीक्षण अहवाल मसुद्यामध्ये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासुन संबंधीत सर्व लेखापरीक्षकांनी आपले लेखापरीक्षण अहवाल कारखान्यास, प्रादेशिक सहसंचालक व साखर आयुक्त कार्यालय यांना विहीत मुदतीमध्ये सादर करावेत.

सोबत :- लेखापरीक्षण अहवाल मसुदा
पृष्ठ क्र. १ ते १२६

(शेखर गायकवाड)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत - मा.प्रधान सचिव,(सहकार) सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय विस्तार, मुंबई ३२ यांना सविनय सादर.

<u>प्रत माहितीसाठी -</u>

१) सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. (सस्नेह)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) /( प्रशासन) सर्व.
३) प्रशासन/अर्थ/उपपदार्थ/विकास/ सांख्यिकी शाखा.
सांख्यिकी शाखेने या कार्यालयाचे वेबसाईटवर सदरहू आदर्श लेखापरीक्षण अहवाल मसुदा तात्काळ अपलोड करावा.
४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ म. मुंबई.
५) सहनिबंधक (लेखापरीक्षण) तथा सदस्य सचिव, राज्यस्तरीय लेखा समिती, म.रा.पुणे.

D:\2018-19\TEMPLETS 18.05.19\TEMPLETS LETTER 21-5-19.docx

राज्यातील सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणासाठी दि.२८.१०.२०१७ ते दि.३१.०३.२०२० या कालावधीकरिता लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: सगृयो २०१७/प्र.क्र.२६०/१४-स,
नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०१८.

वाचा:-

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम ८१ व १९६१ चे नियम ६९,
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सआ/ अनिलेप/ नामतालिका/ आदेश/ कक्ष-१८ /९७६/ २०१४, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४.
३) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सगृयो २०१३/ ३८९/ प्र.क्र.५५/ १४-स, दिनांक २० जानेवारी, २०१७,
४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सआ/लेखापरीक्षण/ कक्ष २०अ /लेप नामतालिका/ २३१३/ २०१७, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१७.
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.सआ/लेखापरीक्षण/कक्ष २०अ/ लेप नामतालिका/२५१६ /सन २०१७, दि.५ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ अन्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाची तरतुद आहे. निबंधकांनी तयार केलेल्या व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामतालिकेवरील लेखापरीक्षकांकडून सहकारी संस्थांनी लेखापरीक्षण करवून घ्यावयाचे आहे. सदर अधिनियमान्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याकरीता लेखापरीक्षकांच्या नेमणूकिची स्वायत्तता संस्थेच्या वार्षिक साधारण सभेस प्रदान करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याकरीता सन २०१७-२०२० या कालावधीसाठी लेखापरीक्षकांची नामतालीका तयार करण्याकरीता अर्हताप्राप्त लेखापरिक्षकांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर अर्जांची छाननी करुन

त्यांनी लेखापरीक्षक नामतालीका अंतिम केली आहे.सदरच्या नामतालीकेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ अन्वये सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण करण्याकरिता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तयार केलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद ११,६४० इतक्या लेखापरिक्षकांच्या नामतालिकेस दि.२८.१०.२०१७ ते दि.३१.०३.२०२० या कालावधीकरीता शासन मान्यता देण्यात येत आहे. लेखापरिक्षकाने करावयाच्या संस्थांच्या लेखापरिक्षणाच्या वर्गीकरणाचा तपशिल परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आला आहे. सदर लेखापरिक्षक त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या लेखापरिक्षक व सहकारी संस्था यांच्या वर्गीकरणानुसार (Auditor Grade) परिशिष्ट "क" मध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण करू शकतात.

२. सर्व सहकारी संस्थांनी परिशिष्ट "ब" मध्ये नमूद वर्गीकरणानुसार त्यांच्या संस्थेचा प्रकार तसेच परिशिष्ट "क" मध्ये नमूद अटी व शर्ती विचारात घेऊनच परिशिष्ट "अ" मधील नामतालिकेतून योग्य लेखापरिक्षकाची नियुक्ती करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२६१५३५१७१९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kamalakar
Sitaram Badgujar

Digitally signed by Kamalakar Sitaram Badgujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=51a947cca196d0cc41c310e8c0d21cc8c2c6cbbacabc7bbc587512dd9efe3326, serialNumber=a25edcec358ca4ae26f3eed03117eab6556eb310f260ca73b83104cd225aef69, cn=Kamalakar Sitaram Badgujar
Date: 2018.02.27 14:26:31 +05'30'

(क.सि.बडगुजर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे.
३) संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.

# परिशिष्ट-क
## अटी व शर्ती

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण व तदनुषंगाने करावयाची कार्यवाही सहकारी अधिनियम, नियम व कार्यालयीन परिपत्रकीय सुचनांप्रमाणे निर्धारीत मुदतीत विहीत पध्दतीने पूर्ण होणेसाठी लेखापरीक्षक नामतालीकेवर नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांनी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करताना खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१) 'अ' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या संस्थांनी, 'अ' सूचीमध्ये समाविष्ठ असणाऱ्या लेखापरीक्षकांचीच नेमणूक करावयाची आहे.

२) 'अ' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणारे लेखापरीक्षक 'अ' 'ब' 'क' वर्गीकरणात समाविष्ठ असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षणास पात्र राहतील.

३) 'अ' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणाऱ्या संस्थांपैकी i) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई, ii) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, iii) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस पणन महासंघ व iv) महाराष्ट्र राज्य सहकारी दुध संघ (महानंदा) या संस्थांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 'अ' सुचीत समाविष्ट असलेले सनदी लेखापाल फर्म, सनदी लेखापाल व सहनिबंधक पात्र असतील.

४) 'ब' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणाऱ्या संस्थांनी, 'अ' किंवा 'ब' वर्गीकरणात समाविष्ठ असणाऱ्या लेखापरीक्षकांचीच नेमणूक करावयाची आहे.

५) 'ब' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणारे लेखापरीक्षक 'ब' किंवा 'क' वर्गीकरणात समाविष्ठ असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षणास पात्र राहतील. म्हणजेच 'अ' वर्गीकरणातील संस्थांचे लेखापरीक्षणास पात्र राहणार नाहीत.

६) 'ब' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणाऱ्या रुपये २५ कोटी पेक्षा कमी ठेवी असणाऱ्या नागरी सहकारी बँका तसेच रुपये १० कोटी व त्यापेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांचे व ग्रामीण बिगर कृषी पतसंस्थांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 'ब' सुचीत समाविष्ट असलेले सनदी लेखापाल व विशेष लेखापरीक्षक वर्ग २ पात्र असतील. लेखापरीक्षक श्रेणी १ व प्रमाणीत लेखापरीक्षक पात्र राहणार नाहीत.

७) 'क' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणाऱ्या संस्थां, 'अ' किंवा 'ब' किंवा 'क' वर्गीकरणात समाविष्ठ असणाऱ्या लेखापरीक्षकांची नेमणूक करू शकतील.

८) 'क' वर्गीकरणामध्ये समाविष्ठ असणारे लेखापरीक्षक केवळ 'क' वर्गीकरणात समाविष्ठ असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षण करण्यास पात्र राहतील. म्हणजेच 'क' सूचीतील लेखापरीक्षक 'अ' किंवा 'ब' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षण करू शकणार नाहीत.

९) प्रत्येक संस्थेने आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीतील (Annual General Meeting) उपरोक्त नमूद केलेल्या सूचीनुसार लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या फर्मची नेमणूक करणे आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नेमणूक केलेल्या लेखापालाच्या फर्मचे/लेखापरीक्षांचे नाव आणि संस्थेच्या लेख्याचे लेखापरीक्षण करण्यासाठीची त्याची लेखी संमती हे विवरणपत्राच्या स्वरूपात संबंधीत संस्थेच्या निबंधकाकडे सादर करणे आवश्यक राहील तसेच संबंधीत लेखापरीक्षकाने सदर ठरावाची प्रत व आपले संमतीपत्र वर नमूद केलेल्या मुदतीत संबंधीत संस्थेच्या निबंधकास व सदर संस्था ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना पोहोच होईल असे पाहावे.

१०) संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीमध्ये त्याच लेखापरीक्षकाची नेमणूक लागोपाठ ३ वर्षांहून अधिक कालावधीसाठी करता येणार नाही याची दक्षता संस्था आणि लेखापरीक्षक यांनी घ्यावयाची आहे.

११) कोणत्याही लेखापरीक्षकास रुपये १ लाखापेक्षा कमी भरणा झालेले भागभांडवल असणाऱ्या संस्था वगळता, एका वित्तीय वर्षात लेखापरीक्षण करण्यासाठी एकूण २० पेक्षा अधिक संस्थांचे लेखापरीक्षण स्विकारता येणार नाही.

१२) सहकारी संस्थांचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती मिळालेल्या लेखापरिक्षकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कायदा १९६० कलम ८१ व त्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदीनुसार व ऑडिटींग स्टॅण्डर्डनुसार लेखापरिक्षण पूर्ण करावयाचे आहे. प्रत्येक लेखापरिक्षकाने संस्थेच्या हातावरील रोख शिल्लक ही आरंभीची रोख शिल्लक अचानकपणे व संस्थेस कोणतीही पूर्वकल्पना न देता तपासावी. तसेच लेखापरिक्षकांच्या अहवालात खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक राहील.

(अ) लेखापरिक्षकाच्या अहवालात निदर्शनास आलेले दोष किंवा अनियमितता यांचा सर्व तपशील असेल आणि आर्थिक अनियमितता व निधीचा दुर्विनियोग किंवा अपहार किंवा लबाडी याबाबतीत, लेखापरीक्षक अन्वेषण करील आणि त्या बाबतची कार्यपध्दती, गुंतलेली रक्कम व त्यास जबाबदार व्यक्ती याचा अहवाल देईल आणि निधीचा असा दुर्विनियोग किंवा अपहार किंवा लबाडी याबाबत आवश्यक त्या सर्व पुराव्यांसह समितीचे पदाधिकारी, सदस्य, संस्थेचे अधिकारी, कर्मचारी किंवा यथास्थिती, कोणतीही अन्य व्यक्ती यांची जबाबदारी निश्चित करेल.

(ब) लेखापरिक्षकाने संस्थेचा नफा वा तोटा यावरील तद्नुरूप परिणामांसह अहवालात लेख्यांची अनियमितता आणि त्यांच्या वित्तीय विवरणपत्रांवरील अपेक्षित भाराचे तपशीलवार विवेचन करावे. संस्थेच्या नफयावर परिणाम करणाऱ्या बाबी लेखापरिक्षण अहवाल भाग १ मध्ये लिहून त्यांचा नफयावर किती परिणाम झाला, संस्थेस नफा आहे किंवा कसे व तो किती याबाबत लेखापरिक्षण दाखल्यात नमूद करावे. याबाबत ऑडिटींग स्टॅण्डर्ड नं.७०० चे उल्लंघन होणार नाही हे लेखापरिक्षकाने पहावे.

(क) लेखापरिक्षकांनी संस्थेच्या समिती व उपसमित्या यांच्या कामकाजाची तपासणी करून कोणतीही अनियमितता किंवा उल्लंघन निदर्शनास आल्यास किंवा कळविण्यात आल्यास, अशा अनियमितता किंवा उल्लंघन याबद्दल जबाबदारी यथोचित रित्या निश्चित करावी.

(ड) लेखापरिक्षकाने संस्थेच्या मिळालेल्या माहितीवरून स्वत:चे अनुभव व ज्ञानाप्रमाणे आणि शासनाच्या व निबंधकांची परिपत्रके, सूचना, संस्थेचे पोटनियम, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व त्याखालील नियम याचा अभ्यास करून संस्थेचे लेखापरिक्षण करावे व त्यानुसार सर्व बाबींचा उल्लेख लेखापरिक्षण अहवालात करावा.

(इ) लेखापरिक्षकाने संस्थेचे वार्षिक हिशोब पत्रके तपासून ही पत्रके, संस्थेचे दप्तर कागदपत्रे व संस्थेचे सभा वृत्तांत इ. बाबींशी जुळतात किंवा नाही याची खात्री करावी व लेखापरिक्षण अहवालात तसा स्पष्ट उल्लेख करावा.

(फ) लेखापरिक्षण अहवाल पुढील अनुक्रमानुसार सादर करणे आवश्यक आहे -- संस्थेस लेखापरिक्षण अहवाल अग्रेषित केलेले पत्र, अनुक्रमणिका, संस्थेचा लेखापरिक्षण नेमणूकीचा ठराव, त्यानुसार दिलेले लेखापरिक्षकाचे संमतीपत्राची प्रत, नमुना क्र.१, संस्थेच्या प्रकारानुसार आवश्यक नमुना, कलम ८१ (२) नुसार १ ते ९ बाबींचे विवेचन, भाग 'अ' 'ब' 'क' मधील विवेचन, लेखापरिक्षकांचा दाखला (बँकांसाठी एन-१ व इतर संस्थांसाठी एन-२ या नमुन्यात) व १ ते ६ परिशिष्टे, आर्थिक पत्रके व त्या अनुषंगिक याद्या, लेखापरिक्षण वर्गवारीचा गुणतक्ता व बँकेचे बाबतीत N. P. A. प्रमाणपत्र, बँकेने दाखविलेला एन.पी.ए. चुकीचा असेल व काही खाती एन.पी.ए. मध्ये असताना पी.ए. मध्ये दाखविली असतील तर खालील नमुन्यातील तक्ता जोडावा.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | येणे बाकी | येणे व्याज | ऑडीटरचे मतानुसार वर्गीकरण | बँकेने केलेले वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

| लेखापरिक्षकाचे मतानुसार आवश्यक तरतूद | बँकेने केलेली तरतूद | कमी/ जादा तरतूद | लेखापरिक्षकाचे मते दाखवावयाचे थकव्याज | बँकेने दाखविलेले थकव्याज | कमी/ जादा तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

लॉग फॉर्म ऑडीट रिपोर्ट (LFAR) व रिझर्व बँक/ नाबार्ड/ निबंधकांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाव्दारे आदेशीत केलेल्या बाबी अनुक्रमे जोडाव्यात. 'अ' भागात संस्थेचे गंभीर स्वरूपाचे दोष, आर्थिक अनियमितता, प्रशासकीय/ फौजदारी कारवाई करणे आवश्यक असणाऱ्या बाबींचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१३) लेखापरिक्षक आपल्या लेखापरिक्षण अहवालात, कोणतीही व्यक्ती, लेख्यासंबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल किंवा इतर कोणत्याही अपराधाबद्दल इंडियन पिनल कोड (IPC) खाली दोषी आहे या निष्कर्षा पर्यंत आला असेल त्याबाबतीत त्याने, त्याचा लेखापरिक्षण अहवाल सादर केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे विनिर्दीष्ट अहवाल (Specific Report) दाखल करणे व निबंधकाची लेखी परवानगी प्राप्त केल्यानंतर अपराधाचा प्रथम माहिती अहवाल (FIR) संबंधित पोलिस ठाण्यात दाखल करणे बंधनकारक राहील, जो लेखापरिक्षक अपराधाचा प्रथममाहिती अहवाल (FIR) दाखल करण्यास कसूर करील तो अनर्हतेस पात्र ठरेल आणि त्याचे नाव लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतून काढून टाकण्यास पात्र ठरेल. तसेच निबंधकास योग्य वाटेल अशा कोणत्याही अन्य कारवाईस देखील पात्र ठरेल.

१४) लेखापरिक्षकेच्या निष्कर्षावरून, लेखापरिक्षकाला असे दिसून आले की, समितीचे कोणतेही सदस्य किंवा संस्थेचे अधिकारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांनी केलेल्या आर्थिक व प्रशासकीय अनियमिततांच्या धडधडीत बाबींमुळे संस्थेला तोटा आला असेल तेव्हा त्याने, विशेष अहवाल तयार करून आपल्या लेखापरिक्षण अहवालासह निबंधकाकडेअ.शा. पत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहील. असा विशेष अहवाल दाखल न करण्याची बाब ही त्याच्या कर्तव्यातील निष्काळजीपणा या सदरात जमा होईल आणि तो लेखापरिक्षक महणून नियुक्तीसाठी किंवा निबंधकास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही कारवाईस पात्र ठरेल.

१५) लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण अहवाल, लेखापरिक्षण पूर्ण झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची सूचना (नोटीस) देण्यापूर्वी खालील कार्यालयांना सादर करावा.

१) संस्था, २) संबंधित निबंधक, ३) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, ४) ज्या वित्तीय संस्थांकडून कर्जे घेतले असतील त्या वित्तीय संस्थेला, ५) रूपये ५ लाखांपेक्षा जास्त भागभांडवल असेल तर सचिव तथा सहनिबंधक (लेखापरिक्षण) राज्यस्तरीय लेखा समिती महाराष्ट्र राज्य, ५ बी. जे. रोड, पुणे, ६)संस्थेचे कार्यक्षेत्र काहीही असले तरी संस्थेचे मुख्यालय ज्या ठिकाणी आहे तो जिल्हा उपनिबंधक/ जिल्हा विशेष लेखापरिक्षक

१६) लेखापरिक्षकाने आपला अहवाल सादर केल्यानंतर अहवालात नमूद केलेल्या दोषांची संस्थेमार्फत संपूर्ण दुरूस्ती करेपर्यंत संस्थेच्या दुरूस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला व संस्थेला आपला अहवाल सादर करणे ही संबंधित लेखापरिक्षकाची जबाबदारी राहील.

१७) अंतर्गत तसेच सतत व समवर्ती लेखापरिक्षण करणारे लेखापरिक्षक त्याच संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यास पात्र राहणार नाहीत.

१८) संस्थेकडून कर्ज घेणारे लेखापरिक्षक त्या संस्थेचे लेखापरिक्षण करण्यास पात्र राहणारा नाहीत.

१९) नामिकेवरील लेखापरीक्षक किंवा त्यांचे नातेवाईक ज्या संस्थेचे संचालक असतील त्या संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण करण्यास पात्र राहणार नाहीत, नातेवाईकांचा तपशिल कायदा कलम ७५ (२) मध्ये दिला आहे.

२०) अनुक्रमांक १५ मध्ये नमूद केल्यानुसार जे लेखापरीक्षक लेखापरीक्षण अहवाल वेळेत सादर करणार नाहित ते नामिकेवर राहण्यास पात्र राहणार नाहीत.

२१) विभागिय सहनिबंधक (लेखापरीक्षण), व जिल्हा विशेष लेखापरीक्षक हे त्या पदावर कार्यरत असतांना संस्थेने लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक म्हणून त्यांचे नांवाचा ठराव पारीत केल्यास त्यांनी मा. सहकार आयुक्त यांची मंजुरी घेवूनच स्विकृती द्यावी.

२२) शासनाच्या सहकार विभागातील नामिकेवरील ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडे कार्यालयीन व प्रशासकीय कामकाज सोपविलेले असेल त्या अधिकारी / कर्मचा-यांनी लेखापरीक्षण स्विकारण्यापूर्वी त्यांचे कार्यालयीन प्रमुखांची लेखी पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

२३) जर लेखापरीक्षक हे सहकार खात्यातील कर्मचा-यांचे नातेवाईक असतील तर ते पॅनेलवर येणेस व लेखापरीक्षण करणेस पात्र राहणार नाहीत.

२४) जर लेखापरीक्षक किंवा त्याचा नातेवाईक जर त्या संस्थेचा आजी / माजी कर्मचारी असतील तर लेखापरीक्षणास पात्र असणार नाहीत.

२५) सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांच्या बाबतीत एका जिल्हयातील लेखापरीक्षकाने त्या त्या जिल्हया तील संस्थेच्या लेखापरीक्षणासाठीच यापूढे स्विकृती द्यावी. जिल्हयाबाहेरील संस्था असल्यास अराजपत्रित अधिकाऱ्यांनी विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण), व राजपत्रित अधिकाऱ्यांनी सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाची मान्यता घेवूनच लेखापरीक्षण स्किारावे.

२६) सहकार खात्याचे लेखापरीक्षकांच्या बाबतीत लेखापरीक्षकांने कुठल्याही संस्थेचे लेखापरीक्षण केले तरी तो ज्या आस्थापनेवर कार्यरत आहे त्या आस्थापनेच्या लेखापरीक्षण शुल्काच्या शिर्षाखालीच लेखापरीक्षण शुल्क भरुन घ्यावे.

२७) शासकिय लेखापरीक्षकांने नियुक्तीच्या ठरावास स्विकृती देतांना लेखापरीक्षणासाठी होणारा खर्च व लेखापरीक्षण शुल्क याचा अंदाज घ्यावा. लेखापरीक्षण शुल्क खर्चापेक्षा कमी होत असलेस लेखापरीक्षण स्विकारु नये. जेणेकरुन त्यांना खातेमार्फत दिलेले समस्याप्रधान संस्थेचे लेखापरीक्षण / चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२८) लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण अहवालाचा भाग अ, लेखापरीक्षकाचा दाखला व लेखापरिक्षीत आर्थिक पत्रके सहकार खात्याच्या वेबसाईवर टाकावीत.

२९) लेखापरीक्षकांनी संस्थेचे लेखापरीक्षण अहवाल सादर करताना लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या संस्था व्यवहारातील गंभीर बाबी, अनियमितता, अफरातफर, गैरव्यवहार, गैरविनियोग व संस्थेची आर्थिक स्थिती व तांत्रीक स्थिती इत्यादी बाबींचा संक्षीप्त तपशीलाचा गोषवारा (Executive Summery) सादर करावा. संक्षीप्त गोषवा-यामध्ये संस्थेने केलेल्या चांगल्या तसेच ज्या बाबींमध्ये सुधारणा करावयाची आहे त्यां बाबींचा समावेश करावा. संक्षीप्त तपशीलाचा गोषवारा (Executive Summery) शिवाय लेखापरीक्षण अहवाल स्विकृत केला जाणार नाही.

३०) लेखापरीक्षकांनी जर जाणीपूर्वक लेखापरीक्षणात निष्काळजीपणा केला, गंभीर बाबी नमुद करण्याचे टाळले आणि अशा बाबी चाचणी अथवा फेरलेखापरीक्षणाचेवेळी निदर्शनासद आल्यास त्यांचे विरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल.

३१) एकाच संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण जे सनदी/परिव्यय/प्रामाणित लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षकांच्या फर्मस् ३ वर्षांपर्यंत लेखापरीक्षण करतील त्यापुढील वैधानिक लेखापरीक्षण याच लेखापरीक्षकांच्या सिस्टर कन्सर्न लेखापरीक्षकांकडून पून्हा पुढील ३ वर्षासाठी करता येणार नाही.

३२) वरील नमुद वर्गीकरणानुसार संस्थेने त्यांचे वर्गासाठी उपलब्ध असणा-या लेखापरीक्षकाची नियुक्ती न करता कनिष्ट वर्गाच्या लेखापरीक्षकांची नियुक्ती केल्यास सदर बाब संबंधीत लेखापरीक्षकाने निबंधकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

-------------------------------

# साखर आयुक्त,
# महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.

पत्ता - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५
दुरध्वनी क्र. ०२०-२५५३८०४१ ते ४४, फॅक्स क्र. ०२०-२५५३८४९७
Email-commsugar.audit@gmail.com Website - www.mahasugar.com.gov.in


जा.क्र.सा.आ./लेखापरीक्षण/कक्ष-१२/लेप.अह.आदर्श मसुदा/ ४८५ /२०२३ दि. ०८ /०२/२०२३

प्रति,

१. मे. जी.एस.थोरात ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल,दि.पेन्टागॉन बिल्डींग ऑफीस नं.२०१ २०३, शाहु कॉलेज रोड,हॉटेल पंचमीजवळ पर्वती पुणे. (पॅनल क्रमांक - १०११०)
२. मे. ढवळे ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंटस
३. मे. पी.एन.गोसावी ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंटस
४. मे. सचिन व्ही.पट्टेबहादुर ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंटस

विषय - **सहकारी साखर कारखान्यांसाठी वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा**

संदर्भ - १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. साआ / लेखापरीक्षण / कक्ष-५ / आ.लेप.अह.मुसदा / ५६८४ / २०१९ दिनांक २६/०६/२०१९
२) आपले पत्र ३०/०१/२०२३
३) सहकार विभागाचा नामतालिका प्रसिध्दीबाबत शासन निर्णय क्र. सगृयो २०१७/ प्र.क्र. २६० / १४-स / मंत्रालय, मुंबई, दिनांक २७ फेब्रुवारी २०१८

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अवलोकन व्हावे.

२/- संदर्भ क्र. १ अन्वयेच्या परिपत्रकान्वये या कार्यालयाने सहकारी साखर कारखान्यांसाठी वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा सन २०१८-१९ या वर्षापासुन लागू केलेला आहे. त्याप्रमाणे संबंधीत लेखापरीक्षकांनी, सनदी लेखापालांनी या आदर्श मसुद्यामध्ये लेखापरीक्षण अहवाल तयार करणे आवश्यक आहे.

३/- संदर्भ क्र. २ अन्वये आपण सहकारी साखर कारखान्यांसाठी तयार केलेला सदरहू लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा तात्काळ रद्द करणेबाबत, माघारी घेणेबाबत विनंती केलेली आहे. वस्तुत: सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक व सांपत्तिक स्थिती, व्यावसायिक व्यवस्थापन, ऊस उत्पादकांप्रति बांधिलकी, निधी व्यवस्थापन, कारखान्याच्या आर्थिक स्थिती निर्देशकांप्रमाणे गुणात्मक दर्जा इ. महत्वपुर्ण आर्थिक विषय व निकषनिहाय एकसमानतेने संबंधीत लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षणावेळी व लेखापरीक्षण अहवालाद्वारे प्रकाशझोत टाकणे आवश्यक आहे. सदरहू संकल्पना मध्यवर्ती ठेवून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण व्हावे, व राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण अहवाल एकसुत्रपणे भागधारक सभासदांपुढे मांडले जावेत, त्याचप्रमाणे कारखान्यांचे लेखे व रेकॉर्ड देखील अद्ययावत लिहीले जावे या हेतुने लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा लागू करणेबाबचे उपरोक्त परिपत्रक या कार्यालयाद्वारे निर्गमित केलेले आहे.

४/- अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका राज्यशासनाने संदर्भ क्र. ३ अन्वये दि. २७ फेब्रुवारी २०१८ रोजी प्रसिध्द केलेली आहे. या नामतालिकेमध्ये नोंदणी होणेसाठी सनदी लेखापाल व त्यांच्या फर्म्स यांनी अर्ज केल्याने व निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करीत असल्याने या सनदी लेखापालांचा सदरहू नामतालिकेमध्ये समावेश झालेला आहे. राज्यशासनाने पारीत केलेला हा शासन निर्णय आपणास, सहकार विभागास बंधनकारक असुन त्यातील **परिशिष्ट क** अन्वये निर्देशीत अटी व शर्तींच्या अधिन राहूनच आपण सहकारी संस्थांचे / कारखान्यांचे लेखापरीक्षण करणे अनिवार्य आहे.

शासन निर्णयातील **परिशिष्ट क** अन्वये एकुण ३२ अटी व शर्ती निर्धारित केलेल्या आहेत. त्यामध्ये शासनाने व निबंधकांनी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके, आदेश, सुचना, निर्देश इ. बाबींचा अभ्यास करून त्याप्रमाणे लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण अहवाल सादर करावा, अशा स्पष्ट सुचना आहेत. निबंधकांनी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके यामध्ये दि. २६ जुन २०१९ रोजी निर्गमित केलेल्या लेखापरीक्षण अहवालाबाबतच्या परिपत्रकाचा देखील समावेश आहे. या अटी, शर्ती व सुचनांचे पालन करणे वैधानिक लेखापरीक्षक म्हणुन सर्व सनदी लेखापालांचे कर्तव्य व जबाबदारी आहे.

५/- सहकारी साखर कारखान्यांचे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे व सभासदांचे हित सुरक्षित राखणेसाठी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण अहवाल विविध आर्थिक व व्यवस्थापकीय मुद्यांबाबत व्यापक व वस्तुनिष्ठ राहतील असा दृष्टीकोन ठेवून लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा लागू करणेत आलेला आहे. या आदर्श लेखापरीक्षण अहवालाच्या मसुदयामुळे साखर कारखाने, ऊस उत्पादक व भागधारक यांना बाधा पोहचत नाही. त्यामुळे हा मसुदा रद्द अथवा मागे घेण्याचे कोणतेही कारण नाही. या उलट सदरहू आदर्श लेखापरीक्षण अहवाल मसुदयामध्ये अजुन कोणकोणत्या बाबींमध्ये सुधारणा करणेस वाव आहे, या विषयी आपण या कार्यालयास कळविल्यास त्याचा निश्चितपणे विचार करणेत येईल.

**सोबत - संदर्भ क्र. ३ चे पत्राची छायाप्रत.**

(शेखर गायकवाड)
आयुक्त, साखर,
महाराष्ट्र राज्य, पुणे

<u>प्रत माहितीसाठी -</u>

१. सी.ए.डॉ.देबाशिश मित्रा, अध्यक्ष, इन्स्टीटयूट ऑफ चार्टर्ड अकौटंट ऑफ इंडिया (ICAI) नवी दिल्ली.
२. सी.ए.अनिकेत तलाठी, उपाध्यक्ष इन्स्टीटयूट ऑफ चार्टर्ड अकौटंट ऑफ इंडिया (ICAI) नवी दिल्ली.

D:\AUDIT DATA 2022-23\LETTERS\C.A.THORAT.docx